# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# कष्ट करणाऱ्यांमागे यश उभे राहते : प्रा. शिंदे

### ढोरोशीत देसाई कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर




ढोरोशी : श्रमसंस्कार शिबिर उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रा. कोंडीबा शिंदे. समवेत संजीव चव्हाण, शरद देशमुख व मान्यवर.

वार्ताहर

पाटण

स्पर्धेच्या युगात टिकावयाचे असेल तर निश्चित ध्येयासाठी सातत्याने कष्ट केलेच पाहिजेत. कष्टाशिवाय फळ मिळत नाही. कष्ट करणाऱ्यांच्याच मागे यश उभे राहत असते, असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे सातारा जिल्हा समन्वयक प्रा. कोंडीबा शिंदे यांनी केले.

येथील बाळासाहेब देसाई कॉलेजच्या ढोरोशी येथील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे सदस्य शरद देशमुख होते. संस्थेचे संचालक संजीव चव्हाण, प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कदम, उपसरपंच सुवर्णा मगर, टी. सी. कॉलेज, बारामती येथील डॉ. आर. टी. सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

संजीव चव्हाण म्हणाले, श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून आपल्याला जीवनाचे धडे मिळत असतात. येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे धैर्य निर्माण होते.

शरद देशमुख म्हणाले, एनएसएसच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मविश्वास वाढतो. आपण सर्वांनी अशा प्रकारच्या शिबिरामध्ये सहभागी झाले पाहिजे.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. सी. एस. एस. कुंभार यांनी केले. प्रा. डॉ. लक्ष्मण गणगे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बजरंग चव्हाण यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. भरत जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमास शामराव मगर, ग्रामपंचायत सदस्य अण्णा पुजारी, पोलीस पाटील राहुल पुजारी, प्राचार्य अनिल मोहिते, एनएसएस सदस्य प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. विशाल कांबळे आदींसह ज्युनिअर तसेच सिनियर विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.